मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ■ मराठी दैनिक

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

# ग्लोबल टाइम्स

www.theglobaltime.com ■ Register No. : RNI - MAHAMAR /2012/44621 ■ मुंबई ■ अंक : २९८ ■ वर्ष : ११

■ शनिवार दि. ४ नोव्हेंबर २०२३ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹ ३.००

## भ्रष्टाचारमुक्त भारत तयार करण्यासाठी तयार व्हा : सरदार नाळे

कोल्हापूर : भ्रष्टाचार ही आपल्या देशातील एक महत्त्वाची समस्या आहे. तिचे मुळापासून उच्चाटन करणे ही आपल्या सर्वांचे नैतिक कर्तव्य आहे. यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूरच्यावतीने भ्रष्टाचारविरोधी प्रबोधनाचे अनेक उपक्रम राबविले जात असून सर्वांनी याचा लाभ घ्यावा. लाच देणे आणि लाच घेणे हा गुन्हा असून तो समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी आता विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. भ्रष्टाचारमुक्त भारत तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी तयार व्हावे, असे प्रतिपादन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूरचे जिल्हा पोलीस उपअधीक्षक सरदार नाळे यांनी केले.

ते विवेकानंद कॉलेज आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उच्च शिक्षण विभाग, कोल्हापूरचे शिक्षण



सहसंचालक डॉ. अशोक उबाळे हे होते. कार्यक्रमासाठी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आणि शिक्षण सहसंचालक विभागीय कार्यालयचे प्रशासन अधिकारी धैर्यशील कागदकर यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. अशोक उबाळे यांनी भ्रष्टाचार ही एक सामाजिक समस्या असून तिने सर्वच क्षेत्रांना पोखरले आहे. भ्रष्टाचार निर्मूलन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपण सर्वांनी यासाठी कटिबद्ध राहून देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावावी असे मत मांडले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# विवेकानंद कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त विविध स्पर्धा

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त भारतीय भरड धान्याच्या विविध पाककृती स्पर्धा व भितीपत्रिका स्पर्धां यांचे आयोजन करण्यात आले होते. त्यास विद्यार्थांचा प्रतिसाद लाभला. आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षामुळे जागतिक स्तरावर मुख्य घटक म्हणून भरड धान्याला प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धा घेण्यात आली. गणितशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एस. पी. थोरात यांनी भरड धान्यांचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी घावण, नाचणी करंजी, ज्वारीचे धपाटे, सॅलेड, आम्लेट, आंबील, राजगीरा हलवा, नाचणी लाडू, बिस्किटे, इडली, आंबोळी, भाकरी, पापड, केक तयार करून आणले होते. स्पर्धेसाठी ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. उर्मिला खोत, भौतिकशास्त्र विभागातील डॉ. सुमैया इनामदार व रसायनशास्त्र विभागातील डॉ. अस्मिता तपासे यांनी काम केले. वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी प्रास्ताविक केले. संजना राठी, साक्षी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. क्षितीज देसाई याने आभार मानले.

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये रक्त गट तपासणी शिबिर

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये प्राणीशास्त्र व डीएमएलटी विभागाच्या वतीने रक्त गट तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिरास विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रतिसाद लाभला. शिबिरासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे नियोजन विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांनी केले.

2023